स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID : hted.vishi3-mh@gov.in

---

क्रमांक: रुसायो-२०२०/प्र.क्र.२४७/विशि-३ दिनांक:- २१ एप्रिल, २०२२.

आवक क्र. ९२४
दि. २/५/२०२२

विषय:- श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयास भौतिक सुविधा या घटकांतर्गत साहित्यांची खरेदी करण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :-(१) सहसंचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/रुसा/२०२०-२१/१०८१, दि.२२.०९.२०२०.
(२) शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४५/विशि-३, दि.०८.०३.२०२१
(३) सहसंचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/रुसा/२०२१-२२/१५९, दि.१५.०३.२०२२.
(४) श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर यांचे पत्र क्र.श्रीमता/रुसा/२१-२२/४९, दि.२७.०१.२०२२

प्रस्तावना :-

श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयास भौतिक सुविधा या घटकांतर्गत रु. ०१.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा), मुंबई यांनी सदर महाविद्यालयास आवश्यक साहित्यांची Gem Portal वरुन खरेदी करण्यासाठी Equipments अंतर्गत येणाऱ्या साहित्याची रक्कम रु.४०,०६,२१८/- आणि Renovation & upgradation अंतर्गत येणाऱ्या साहित्याची रक्कम रु.२२,७०,८००/- असे एकूण रु.६२,७७,०१८/-एवढ्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस संदर्भीय पत्र क्र. (१) अन्वये केली होती. सदर प्रस्तावाची पडताळणी केली असता सदर प्रस्तावातील साहित्यांची संख्या, त्यांची किंमत व एकूण रक्कम यामध्ये बरीचशी तफावत आढळून आल्याने सदर प्रस्ताव तपासून फेरसादर करण्याबाबत रुसा संचालनालयास संदर्भीय पत्र क्र.(२) अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर महाविद्यालयाने सदर त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव महाविद्यालयाने दि.१२.०४.२०२१ रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी फेरसादर केला असल्याचे संदर्भीय पत्र क्र. (४) अन्वये रुसा संचालनालयास कळविले आहे. त्यानुसार सदर महाविद्यालयाच्या खरेदीच्या प्रस्तावास

लेखा विभाग
उचित कार्यवाहीसाठी
2.5.22

प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत सहसंचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा), मुंबई यांनी संदर्भीय पत्र क्र. (३) अन्वये विनंती केली आहे.

ज्ञापन :-

राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा), मुंबई यांनी विनंती केल्यानुसार, श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयाच्या भौतिक सुविधा या घटकांतर्गत आवश्यक साहित्यांची खरेदी करण्यासाठी Equipments अंतर्गत येणाऱ्या साहित्याची रक्कम रु.४०,०६,२१८/- आणि Renovation & upgradation अंतर्गत येणाऱ्या साहित्याची रक्कम रु.२२,७०,८००/- असे एकूण रु.६२,७७,०१८/- एवढ्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, दि.१७ एप्रिल, २०१५ मधील वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र. ३-अ, नियम क्र.७, अ.क्र. ४, नियम क्र.७ व अ.क्र.२७-अ, नियम क्र.७६ यानुसार प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

सदर साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, दि.१७ एप्रिल, २०१५ च्या तरतुदी तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार करावी. तसेच सदर खरेदी दि.२४ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयानुसार GeM पोर्टल वरुन करण्यात यावी. ज्या साधनसामुग्री व उपकरणे शासनाच्या GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास सदर साधनसामुग्री व उपकरणे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६.११.२०१४ च्या शासन निर्णयान्वये ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन खरेदी प्रक्रिया करण्यात यावी. यावरील खर्च प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेच्या मर्यादेत राहील, याची दक्षता घ्यावी. खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे तात्काळ सादर करण्यात यावीत.

उपरोक्त बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक-डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२ - विद्यापीठांना सहाय्य, - (०७) (०१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (६० टक्के केंद्र हिस्सा) (२२०२ आय २६३) व (०७) (०२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (४० टक्के राज्य हिस्सा) (२२०२ आय २७२), ३१ सहायक अनुदाने " या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्रकुपवार

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

३) महालेखापाल, (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.

४) प्राचार्य, श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर

५) कार्यासन अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) अधिदान व लेखा अधिकारी, कोल्हापूर

७) निवड नस्ती (विशि- ३)